**<u>वादीचा साक्षीदार क्र.२ चा शपथेवर उलटतपास प्रतिवादी क्र.१ तर्फे विधीज्ञ श्री. बी. एफ. दिवे यांचे मार्फत:-</u>**

२.　　माझे शिक्षण ४ थी पर्यंत झालेले आहे. मला लिहीता व वाचता येत नाही. मला मिना अगस्तीन शिंदे नावाची एक बहीन आहे व ती पुणे येथे राहते. मला चार भाऊ आहेत. त्यांची नावे बापु (प्रतिवादी क्र.२), राजु (प्रतिवादी क्र.३), संजु जयवंत सगळगिळे व विजय जयवंत सगळगिळे असे आहेत. माझ्या आजोबाचे नाव मला सांगता येणार नाही. माझे शिक्षण श्रीरामपुर येथे झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी शिक्षण घेत असतांना माझे आई वडील टाकळीमिया येथे राहात होते.

३.　　मयत विजय सगळगिळे यांचे लग्न दिग्रस येथील उषा हिच्या सोबत झाले होते. उषा हीच्या वडीलांचे नाव मला सांगता येणार नाही. माझे वडील जयवंत मयत झाल्यानंतर त्यांच्य वारसांची नावे अभिलेखावर नोंदविण्यात आली होती किंवा कसे, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे व प्रतिवादी क्र.४ चे नाव मयत जयवंत यांचे वारस म्हणुन नोंदविल्या गेले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मयत विजय हा अविवाहीत होता व त्याला मुलबाळ नव्हते. माझ्या आईचे नाव लक्ष्मीबाई असे होते. माझ्या सावत्र आईचे नाव कांताबाई असे होते. कांताबाई यांना एक मुलगा व एक मुलगी असे अपत्य होते. तसेच लक्ष्मीबाई यांना मी व इतर तिन मुले असे अपत्य आहेत. मयत जयवंत सगळगिळे यांचे वारस म्हणुन नोंद होण्यासाठी मी महसुल खात्याकडे अर्ज दिला नव्हता. प्रतिवादी क्र.२ व ३ यांच्या नावांची नोंद दावा मिळकतीवर वारस म्हणुन झाल्याबाबतची माहीती मला माझ्या भावाकडुन मिळाली. मला त्याबाबत माहीती कोणत्या भावाकडुन मिळाली, त्याचे नाव मला सांगता येणार नाही.

४.　　मयत जयवंत यांच्या नावे असलेल्य जमीनींचे गट क्रमांक मला सांगता येणार नाही. प्रतिवादी क्र.२ व ३ यांचेमध्ये वाटप झालेले आहे किंवा कसे, हे मला माहीत नाही. प्रतिवादी क्र.२ व ३ यांनी दावा मिळकतीचे खरेदीखत कोणाला करुन

दिले, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हा टाकळीमिया येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र.१ हा माझ्या आई वडीलांच्या शेजारी राहात होता. मला प्रतिवादी क्र.१ याच्या हक्कामध्ये करुन दिलेल्या खरेदीखताची माहीती कोणी दिली, हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी जयवंत सगळगिळे यांची मुलगी नाही. हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकतीमध्ये जयवंत सगळगिळे यांची वारस म्हणुन माझा कोणताही हक्क नाही. मी दाखल केलेल्या शपथपत्रातील मजकुराबाबत शरद पवार याने माहीती दिली. हे म्हणण खरे आहे की, मी दाखल केलेल्या शपथपत्रावर मी फक्त सही केली. हे म्हणणे खरे नाही की, शरद पवार हा वादींचा मामा नाही. हे म्हणणे खरे नाही की, शरद पवार याचे सांगण्यावरुन मी न्यायालयामध्ये खोटे शपथपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपुर्ण मजकुर खोटा असुन मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपस पुर्ण.

सरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

Digitally signed by MAYURSINGH DILIPSINGH GAUTAM
Date: 2024.08.09 14:50:00 +0530

दिनांकः ०७/०८/२०२४
राहुरी

(मयुरसिंह दि. गौतम)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश,
क.स्तर, राहुरी.